| MHOS030029912021 | दाखल तारीख | – | १९/११/२०२१ |
|---|---|---|---|
| | नोंदणी तारीख | – | १९/११/२०२१ |
| | निकाल तारीख | – | ११/०८/२०२६ |
| | कालावधी | – | वर्षे महिने दिवस<br>०४ ०८ २३ |

**संक्षिप्त फौजदारी खटला क्र.१५४५/२०२१** **निशाणी क्र.११ लगत.**

**फॉर्म नं. ३२**

**भाग – अ**

**(निकालपत्राचे शीर्षक पृष्ठ)**

**( फौजदारी नियमावलीच्या प्रकरण ६ मधील परिच्छेद क्र. ४४(१))**

| **प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, उस्मानाबाद.<br>यांचे न्यायालयात<br>( पीठासीन अधिकारी – श्रीमती रेणुका द. गायकवाड )<br>निकालपत्र<br>दिनांक ११ ऑगस्ट, २०२६.** | | |
|---|---|---|
| **उस्मानाबाद शहर पोलीस ठाण्यामधील अपराध क्र.१५२/२०२१, भारतीय दंड विधेयक कलम २७९, ३०४ (अ), ३३७, ३३८ व मोटार वाहन कायदा कलम १८४ अन्वये.** | | |
| **फिर्यादी** | | महाराष्ट्र सरकार तर्फे ठाणे अंमलदार, उस्मानाबाद शहर पोलीस स्टेशन,उस्मानाबाद. |
| **तर्फे विधीज्ञ** | | श्रीमती एम.एफ. पाकजादे सहाय्यक सरकारी अभियोक्ता |
| **आरोपी** | | **सुनिल गोपीनाथ दांगट,**<br>वय – २३ वर्षे, धंदा – वाहन चालक,<br>रा. सकनेवाडी, ता. जि. उस्मानाबाद. |
| **तर्फे विधीज्ञ** | | आरोपी तर्फे विधीज्ञ श्री. आर.सी. खोचरे. |

**भाग – ब**

**( फौजदारी नियमावलीच्या प्रकरण ६ मधील परिच्छेद क्र. ४४(२))**

| | |
|---|---|
| गुन्हा घडल्याचा दिनांक | दि.२३/०५/२०२१ |
| प्रथम वर्दी अहवाल दिनांक | दि.१३/०६/२०२१ |
| दोषारोपपत्राचा दिनांक | दि.१५/११/२०२१ |

| | |
|---|---|
| दोषारोप वाचून दाखविल्याची तारीख | दि.०९/०१/२०२६ |
| पुरावा सुरु झाल्याची तारीख | दि.२७/०२/२०२६ |
| प्रकरण निकालपत्राकरिता ठेवल्याची तारीख | – |
| निकालपत्राची तारीख | दि.११/०८/२०२६ |
| शिक्षेच्या आदेशाची तारीख, जर शिक्षा झाली असेल तर | – |

**आरोपीचा तपशील**

| आरोपी क्र. | आरोपीचे नाव | अटक केल्याची तारीख | जामीनावर सोडल्याची तारीख | दोषारोप | आरोपीस निर्दोष मुक्त केले अथवा दोषी ठरवले | ठोठावलेली शिक्षा | फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ४२८ च्या उद्देशाने खटल्या दरम्यान अटकेचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | सुनिल गोपीनाथ दांगट | २३/०६/२०२१ | २३/०६/२०२१ | भारतीय दंड विधेयक कलम २७९, ३०४ (अ), ३३७, ३३८ व मोटार वाहन कायदा कलम १८४ अन्वये. | आरोपीची निर्दोष मुक्तता करण्यात आली. | -- | -- |

**भाग – क**

**( फौजदारी नियमावलीच्या प्रकरण अध्याय ६ मधील परिच्छेद क्र. ४४(३))**

**अ. अभियोगपक्षाच्या साक्षीदारांची यादी**

| क्रमांक | नाव | पुराव्याचे स्वरुप (प्रत्यक्षदर्शी साक्षीदार, पोलीस साक्षीदार, तज्ञ साक्षीदार, वैद्यकीय साक्षीदार, पंच साक्षीदार व इतर साक्षीदार ) |
|---|---|---|
| अ.सा.क्र.१ | विकास सुनिल ईटकर | फिर्यादी |

| क्रमांक | नाव | पुराव्याचे स्वरुप (प्रत्यक्षदर्शी साक्षीदार, पोलीस साक्षीदार, तज्ञ साक्षीदार, वैद्यकीय साक्षीदार, पंच साक्षीदार व इतर साक्षीदार ) |
|---|---|---|
| अ.सा.क्र.२ | अभिजीत संजीतकुमार गाईन | साक्षीदार |
| अ.सा.क्र.३ | मिताली सत्यजीत गाईन | साक्षीदार |

**ब. बचाव पक्षाचे साक्षीदार, जर असतील तर :**

| क्रमांक | नाव | पुराव्याचे स्वरुप (प्रत्यक्षदर्शी साक्षीदार, पोलीस साक्षीदार, तज्ञ साक्षीदार, वैद्यकीय साक्षीदार, पंच साक्षीदार व इतर साक्षीदार ) |
|---|---|---|
| – | – | – |

**क. न्यायालयाचे साक्षीदार, जर असतील तर :**

| क्रमांक | नाव | पुराव्याचे स्वरुप (प्रत्यक्षदर्शी साक्षीदार, पोलीस साक्षीदार, तज्ञ साक्षीदार, वैद्यकीय साक्षीदार, पंच साक्षीदार व इतर साक्षीदार ) |
|---|---|---|
| – | – | – |

**अभियोगपक्ष/बचावपक्ष/न्यायालयातर्फे देण्यात आलेल्या निशाणीची यादी**

**अ. अभियोगपक्ष :**

| अ.क्र. | साक्षीदार आणि निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| – | – | – |

**ब. बचावपक्ष :**

| अ.क्र. | साक्षीदार आणि निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| – | – | – |

**क. न्यायालयातर्फे देण्यात आलेली निशाणी :**

| अ.क्र. | साक्षीदार आणि निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| – | – | – |

## ड. मुद्देमालातील वस्तू अथवा आर्टीकल :

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| – | – | – |

## निकालपत्र
## ( दिनांक ११ ऑगस्ट, २०२६)

आरोपी भारतीय दंड विधेयक कलम २७९, ३०४ (अ), ३३७, ३३८ व मोटार वाहन कायदा कलम १८४ अन्वये शिक्षेस पात्र गुन्हयाच्या संपरिक्षणास सामोरा जात आहे.

२. अभिलेखावरील एकंदरीत मौखिक व कागदोपत्री पुराव्याचे अवलोकन केले असता खालील मुद्दे माझ्या विचाराधीन आहेत व त्यावरील निष्कर्ष मी खालील कारणमिमांसेद्वारे नोंदविले आहेत.

| मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|
| १. अभियोगपक्षाने सिद्ध केले आहे का की, आरोपीने त्याच्या ताब्यातील चारचाकी वाहन क्रमांक एम.एच.१३/डी.ई–५९३१ हे वाहन हयगयीने किंवा निष्काळजीपणे व भरधाव वेगात चालविले व त्यामुळे फिर्यादीस व मयत सत्यजित संजित गाईन यांना दुखापत अगर क्षती पोहोचण्याचा संभव होता ? | नाही. |
| २. अभियोगपक्षाने हे सिद्ध केले आहे का की, आरोपीने त्याच्या ताब्यातील चारचाकी कार क्रं. एम.एच.१३/डी.ई–५९३१ हयगयीने किंवा निष्काळजीपणे व भरधाव वेगात चालवून मयत सत्यजित संजित गाईन यांच्या मृत्युस कारणीभूत झाला, की जो सदोष मनुष्यवध नव्हता? | नाही. |
| ३. अभियोगपक्षाने सिद्ध केले आहे का की, आरोपीने त्याच्या ताब्यातील उपरोक्त वाहन हयगयीने किंवा निष्काळजीपणे चालवून अपघात केला व फिर्यादीस व मयत सत्यजित संजित गाईन यांना जखमी केले ? | नाही. |
| ४. अभियोगपक्षाने सिद्ध केले आहे का की, आरोपीने त्याच्या ताब्यातील उपरोक्त वाहन हयगयीने किंवा निष्काळजीपणे | नाही. |

| | | |
|---|---|---|
| | चालवून अपघात केला व फिर्यादीस व मयत सत्यजित संजित गाईन यांना गंभीर जखमी केले ? | |
| ५. | अभियोग पक्षाने सिध्द केले आहे का की, उपरोक्त दिवशी, वेळी व ठिकाणी आरोपीने त्याचे ताब्यातील उपरोक्त वाहन हयगयीने किंवा निष्काळजीपणे चालवून तसेच रस्त्याची परिस्थिती न पाहता किंवा त्या वेळी रस्त्यावर असणा–या गर्दीचा अगर संभाव्य गर्दीचा विचार न करता चालविले ? | नाही. |
| ६. | काय आदेश ? | आरोपीची निर्दोष मुक्तता करण्यात येते. |

३. अभियोगपक्षाने आरोपीविरुद्धचा गुन्हा सिद्ध करण्यासाठी भाग–क मध्ये नमूद एकुण तीन साक्षीदार तपासण्यात आले. दोषारोपाच्या अनुषंगाने आरोपीविरुद्ध कोणताही पुरावा मिळून आला नसल्याकारणाने आरोपीचा फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ३१३ प्रमाणे जबाब नोंदवण्यात आला नाही.

४. अभियोगपक्षाचे सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्रीमती एम.एफ. पाकजादे व आरोपीतर्फे विधीज्ञ श्री. आर.सी. खोचरे यांचे युक्तिवाद ऐकले.

## कारण मिमांसा

**मुद्दा क्र.१ ते ५ करिता** :–

५. आरोपीविरुद्धचा गुन्हा सिध्द करण्यासाठी अभियोगपक्षास घटनेच्या वेळी आरोपीने त्याच्या ताब्यातील चारचाकी वाहन क्रमांक एम.एच.१३/डी.ई–५९३१ हयगयीने किंवा निष्काळजीपणे व भरधाव वेगात चालवून अपघात केल्याचे व सदर अपघातामध्ये फिर्यादी व मयत सत्यजित संजित गाईन यांना गंभीर दुखापत झाल्याचे व मयत सत्यजित संजित गाईन याचे मृत्युस आरोपी कारणीभूत झाला जो सदोष मनुष्यवध नव्हता हे सिध्द करणे गरजेचे आहे.

६. त्या अनुषंगाने अभियोगपक्षातर्फे तपासण्यात आलेला साक्षीदार क्र. १ विकास सुनिल इटकर हा प्रस्तुत प्रकरणात फिर्यादी असून त्याचे कथनानुसार घटना दिनांक २३/०५/२०२१ रोजी घडली होती. फिर्यादीने तथाकथीत अपघाताच्यावेळी गाडीमध्ये कोण–कोण होते हे त्याला माहिती नसल्याचे तसेच घटनेबाबत त्याला काही आठवत

नसल्याचे त्याने कथन केले. फिर्यादीने तक्रार दाखल केल्याचे मान्य केले आहे, परंतु, तक्रारीमधील मजकूराबाबत अनभिज्ञता दर्शविली आहे.

७. अभियोगपक्षातर्फे तपासण्यात आलेला साक्षीदार क्र.२ अभिजीत हा अपघातातील मयत सत्यजीत गाईन याचा भाऊ असुन साक्षीदार क्र. ३ मिताली ही मयत सत्यजीत गाईन याची पत्नी आहे. साक्षीदार क्र. २ अभिजीत तसेच साक्षीदार क्र. ३ मिताली यांनी त्यांना सत्यजीत गाईन याच्या अपघाताबाबत माहिती मिळाल्याचे तसेच अपघात कसा झाला होता हे त्यांना माहित नसल्याचे कथन केले आहे. साक्षीदार क्र. २ अभिजीत तसेच साक्षीदार क्र. ३ मिताली यांनी देखील अभियोग पक्षास सहाय्य केले नसल्यामुळे अभियोग पक्षामार्फत त्यांचा उलट–तपास नोंदविणेत आला. परंतु, साक्षीदार क्र. २ अभिजीत तसेच साक्षीदार क्र. ३ मिताली यांनी त्यांच्या जबाबातील अधोरेखांकीत भाग 'ब' व 'क' मधील मजकूर नाकरला आहे. अभिलेखावरील एकंदरीत साक्षी पुराव्याची पडताळणी केली असता असे दिसून येते की, अभियोग पक्षातर्फे तपासण्यात आलेले फिर्यादी, तसेच साक्षीदार क्र. २ अभिजीत व साक्षीदार क्र. ३ मिताली यांनी त्यांच्या जबाबाशी विसंगत अशी साक्ष दिल्यामुळे अभियोगपक्षास आरोपीविरुद्ध ठेवण्यात आलेले दोषारोप निःसंशयपणे सिद्ध करण्यास अपयश आले आहे. अशाप्रकारे आरोपीविरुध्दचा दोषारोप संशयापलीकडे शाबीत करण्याकरीता कोणताही सबळ व संयुक्तीक पुरावा अभिलेखावर उपलब्ध नाही. त्यामुळे मी मुद्दा क्र.१ ते ५ करिता नकारार्थी निष्कर्ष नोंदवित आहे.

**<u>मुद्दा क्र. ६ करिता</u> :–**

८. मुद्दा क्र.१ ते ५ वरील नकारार्थी निष्कर्षाआधारे आरोपी निर्दोष मुक्त होण्यास पात्र असल्याचे माझे मत बनते. त्यामुळे मुद्दा क्र.६ च्या उत्तरार्थ मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करते.

## <u>आ दे श</u>

१) आरोपी सुनिल गोपीनाथ दांगट, रा. सकनेवाडी, ता. जि. उस्मानाबाद याची भारतीय दंड विधेयक कलम २७९, ३०४ (अ), ३३७, ३३८ व मोटार वाहन कायदा कलम १८४ अन्वये शिक्षेस पात्र गुन्हयांमधून फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम २५५(१) अन्वये निर्दोष मुक्तता करण्यात येते.

२) आरोपीची बंधपत्रे रद्दबातल करण्यात येतात.

३) आरोपीने फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम ४३७(अ) अन्वये रुपये १५,०००/– (पंधरा हजार रुपये) चे वैयक्तीक बंधपत्र सादर करावे.

(निकालपत्र खुल्या न्यायालयात जाहीर करण्यात आले.)

DISTRICT COURTS MAHARASHTRA
Digitally signed by GAIKWAD RENUKA DATTATRAYA
Date: 2026.08.11 18:13:38 -0400

ठिकाण – उस्मानाबाद.
दिनांक – ११/०८/२०२६

( **श्रीमती रेणुका द. गायकवाड** )
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,
उस्मानाबाद (न्यायालय क्रं.१).